ePaper

## “सुवेंदू अधिकारींचा मृत्यू व्हावा अशी अल्लाकडे दुवा मागणार”; हुमायूँ कबीर



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 27 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 3 वरुन...

नवी सांगवीत २९ सप्टेंबरला "रोजगार महाकुंभ"

### २६ टक्के आमदार-खासदारांची भाजपाला पसंती; ADR अहवालातून खुलासा

# ४ वर्षात १११ नेत्यांचे पक्षांतर!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशाच्या राजकारणात सत्ता आणि पदासाठी लोकप्रतिनिधींचे पक्षांतर काही नवीन नाही. मात्र, गेल्या चार वर्षांत पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (ADR) आणि नॅशनल इलेक्शन वॉचच्या अहवालातून समोर आले आहे. २०२२ ते २०२६ या कालावधीत देशभरातील तब्बल १११ निवडून आलेल्या खासदार आणि आमदारांनी आपला पक्ष बदलला आहे.**

ADRने २४ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, पक्ष बदलणाऱ्यांमध्ये २६ लोकसभा खासदार, ७ राज्यसभा खासदार आणि ७८ आमदारांचा समावेश आहे. या १११ लोकप्रतिनिधींपैकी २९ जणांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. यामध्ये सात राज्यसभा खासदार आणि २२ आमदारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या कालावधीत एकही लोकसभा खासदार थेट भाजपमध्ये गेल्याची नोंद अहवालात करण्यात आलेली नाही.

पक्षांतराच्या आकडेवारीत नागालँड ३२ लोकप्रतिनिधींसह आघाडीवर आहे. त्यानंतर पश्चिम बंगालमध्ये २०, तेलंगणात ९, तर गोवा आणि पंजाबमध्ये प्रत्येकी ८ लोकप्रतिनिधींनी पक्ष बदलला. नागालँडमधील बहुतांश प्रकरणे पक्षाच्या विलीनीकरणाशी संबंधित असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

भाजपमध्ये दाखल झालेल्या सात राज्यसभा खासदारांमध्ये आम आदमी पक्षातून निवडून आलेले स्वाती मालीवाल, अशोक मित्तल, हरभजन सिंग, राघव चड्ढा, संदीप कुमार पाठक, विक्रमजीत सिंग साहनी आणि राजिंदर गुप्ता यांचा समावेश आहे. आमदारांमध्ये गोव्यातील काँग्रेसचे आठ, गुजरातमधील चार आणि हिमाचल प्रदेशातील दोन आमदार भाजपमध्ये दाखल झाले. याशिवाय मणिपूरमधील जनता दलाचे पाच आमदार, उत्तर प्रदेशातील समाजवादी पक्षाचे मनोज कुमार पांडे, मध्य प्रदेशातील काँग्रेसच्या निर्मला सप्रे आणि कर्नाटकातील जी. जनार्दन रेड्डी यांचाही या आकडेवारीत समावेश आहे.

नागालँडमधील ३२ लोकप्रतिनिधींच्या पक्षबदलाचा आकडा प्रामुख्याने NDPPच्या आमदारांच्या NPFमध्ये झालेल्या विलीनीकरणामुळे आहे. त्यामुळे हा आकडा वैयक्तिक पक्षांतरापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा असल्याचे ADRने नमूद केले आहे.

पक्ष सोडणाऱ्या लोकप्रतिनिधींमध्ये NDPPचे २५, तृणमूल काँग्रेसचे २० आणि काँग्रेसचे १९ लोकप्रतिनिधी आहेत. या तीन पक्षांमधून एकूण ६४ लोकप्रतिनिधी बाहेर पडले असून, हा एकूण पक्षांतराच्या संख्येच्या सुमारे ५८ टक्के हिस्सा आहे.

या आकडेवारीच्या पार्श्वभूमीवर ADRने पक्षांतरबंदी कायद्यात सुधारणा करण्याची मागणी केली आहे. खासदार आणि आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय सभागृहाच्या अध्यक्षांऐवजी राष्ट्रपती किंवा राज्यपालांनी निवडणूक आयोगाच्या सल्ल्याने घ्यावा, अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घेण्यासाठी निश्चित कालमर्यादा असावी आणि पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींना काही काळ सार्वजनिक किंवा मंत्रीपद भूषविण्यावर निर्बंध असावेत, अशा शिफारशी ADRने केल्या आहेत.

### भाजपमध्ये २९ जणांचा प्रवेश

ADRच्या अहवालानुसार पक्ष बदललेल्या १११ लोकप्रतिनिधींपैकी २९ जण भाजपमध्ये दाखल झाले. यामध्ये ७ राज्यसभा खासदार आणि २२ आमदारांचा समावेश आहे. एकाही लोकसभा खासदाराने थेट भाजपमध्ये प्रवेश केल्याची नोंद नाही.



### नागालँडमध्ये सर्वाधिक पक्षांतर

नागालँडमध्ये ३२ लोकप्रतिनिधींनी पक्ष बदलला असून देशात हा सर्वाधिक आकडा आहे. त्यानंतर पश्चिम बंगालमध्ये २०, तेलंगणात ९, तर गोवा आणि पंजाबमध्ये प्रत्येकी ८ पक्षांतराची प्रकरणे नोंदली गेली.

### पक्षांतरबंदी कायद्यात बदलाची मागणी

पक्षांतराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ADRने दहाव्या अनुसूचीतील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची मागणी केली आहे. अपात्रतेच्या याचिकांवर निर्णयासाठी निश्चित कालमर्यादा आणि पक्षांतर करणाऱ्यांवर काही काळ सार्वजनिक पदाची बंदी घालण्याची शिफारस करण्यात आली आहे.



(टीप: असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (ADR) ही १९९९ मध्ये आयआयएम अहमदाबादच्या प्राध्यापकांनी स्थापन केलेली एक संस्था आहे. उमेदवारांचे गुन्हेगारी रेकॉर्ड आणि मालमत्ता जाहीर करणे बंधनकारक करणाऱ्या ऐतिहासिक सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात एडीआरची महत्त्वाची भूमिका होती.)

# पुण्यात पोलिसांचे नियोजन कागदावरच

## रात्री बारानंतर मंडळांमध्ये वाढले मोठे अंतर; मिरवणुकीचा वेग मंदावला

**महाईन्यूज । पुणे**

**गणेश विसर्जन मिरवणूक शिस्तबद्ध आणि वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी पुणे पोलिसांकडून महिनाभर आधीपासून बैठका, सूचना आणि नियोजन करण्यात आले. मात्र, शुक्रवारी प्रत्यक्ष मिरवणुकीत रात्री बारानंतर या नियोजनाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचे चित्र दिसून आले. चारही प्रमुख विसर्जन मार्गांवर मंडळांमध्ये मोठे अंतर पडले. काही ठिकाणी हे अंतर एक किलोमीटरपर्यंत वाढल्याने मिरवणुकीचा वेग मंदावला आणि मिरवणुकीतील सलगता खंडित झाली.**



मिरवणूक वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक मंडळाने निश्चित क्रमाने आणि सलगपणे मार्गस्थ व्हावे, यासाठी पोलिसांकडून विविध स्तरांवर बैठका घेतल्या जातात. रस्त्यात थांबू नये, मागील मंडळाला अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि पुढील मंडळापासून अनावश्यक अंतर पडू देऊ नये, यावर विशेष भर दिला जातो. बेलबाग चौकातून सकाळी सव्वादहाच्या सुमारास विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. मानाचे गणपती ठरलेल्या क्रमाने मार्गस्थ झाले. त्यानंतर महापालिकेचा गणपती, त्वष्टा कासार, सराफ सुवर्णकार मित्र मंडळ आणि सायंकाळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची मिरवणूक पुढे गेली. सुरुवातीच्या टप्प्यात मंडळांमध्ये फारसे अंतर नव्हते. मात्र, रात्री बारानंतर परिस्थिती बदलली. डीजेचा आवाज बंद झाल्यानंतर अनेक मंडळे रस्त्यावरच थांबली. काही मंडळांनी ढोल सुरू ठेवला; परंतु एका मंडळाचा थांबा वाढल्यानंतर त्यामागील मंडळाचीही गती कमी होत गेली. पुढील मंडळ पुढे निघून गेल्याने दोन मंडळांमधील अंतर हळूहळू वाढत गेले. चारही प्रमुख मार्गांवर असे चित्र अनेक ठिकाणी दिसले.

गणेशोत्सवाच्या वैभवशाली परंपरेनुसार शुक्रवारी सकाळी पावणेनऊच्या सुमारास मिरवणुकीला सुरुवात झाली. कसबा गणपतीच्या उत्सव मंडपासून सकाळी आठ वाजून ४३ मिनिटांनी मिरवणूक सुरू झाली. त्यानंतर अखिल महात्मा फुले मंडई येथील टिळक पुतळ्यापासून महापौर, पालकमंत्र्यांसह अन्य मान्यवरांच्या श्रींची आरती होऊन सकाळी नऊ वाजून ५५ मिनिटांनी पुढील मिरवणूक सुरू झाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मानाच्या पाचव्या केसरी गणपतीची मिरवणूक शुक्रवारी सायंकाळी सहा वाजून १२ मिनिटांनी संपली. त्यानंतर लक्ष्मी रस्त्याने महोत्सवी मंडळे अन्य मंडळांचे विसर्जन मिरवणूक रथ मार्गस्थ झाले. यापाठोपाठ टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता आणि केळकर रस्त्यावरील मिरवणुकाही निघाल्या. चारही विसर्जन मार्गांवरून सुमारे सव्वासहाशे मंडळे मिरवणुकीत सहभागी झाली होती. भवानी पेठेतील कासेवाडी येथील महाराष्ट्र तरुण मंडळाने मिरवणुकीची सांगता केली. त्यानंतर पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी माध्यमांशी संवाद साधला. या वेळी पोलिस सहआयुक्त संजय दराडे, अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील, संजय बनसोडे आणि तेजस्वी सातपुते आदी उपस्थित होते. गणेश मंडळे, कार्यकर्ते आणि पुणेकरांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले.

### मिरवणुकीला विक्रमी वेळ

पुण्याच्या वैभवशाली गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीने यंदा वेळेचा नवा विक्रम नोंदविला. अनंत चतुर्दशीला सकाळी आठ वाजून ४३ मिनिटांनी सुरू झालेल्या मिरवणुकीची सांगता शनिवारी सायंकाळी सात वाजून ३३ मिनिटांनी झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत आठ मिनिटांनी मिरवणुकीचा वेळ वाढला असून, आजवरची ही सर्वाधिक वेळ चाललेली मिरवणूक ठरली. दोन गणेश मंडळांतील वाढलेले अंतर, चौकाचौकात स्थिर वादनासाठी घेतलेला जास्त वेळ यामुळे मिरवणूक लांबल्याचे दिसून आले.

# विद्यानंद बापटांची ठाम मागणी... ध्वनिवर्धकांवर २४ तसं बंदी हवी!

**महाईन्यूज । पुणे**

**'मोठा आवाज येतो म्हणूनच त्या उपकरणाला लाऊडस्पिकर म्हटले जाते. सार्वजनिक सण-उत्सवाच्या सबबीखाली खुल्या वातावरणात ध्वनिवर्धक (लाऊडस्पीकर) वाजवण्याची परवानगी देता कामा नये. शांततेमध्ये जगणे हा माणसाचा मूलभूत अधिकार आहे. रात्री बारा ते पहाटे सहा एवढाच वेळ नव्हे तर २४ तासही सार्वजनिक ठिकाणी ध्वनिवर्धकावर बंदी असली पाहिजे,' असे आग्रही मत ध्वनिप्रदूषणाविरोधात भूमिका घेणारे विद्यानंद बापट यांनी रविवारी मांडली. 'उत्सवखोरांचे प्रबोधन करणे हा मूर्खपणा ठरेल, अशी टिप्पणी करून बापट यांनी 'हजार कावळे कावकाव करत असतील तर कोकिळेचे कूजन ऐकू येणारच नाही,' याकडे लक्ष वेधले.**




मधुरजग फाउंडेशन, ब्राइट्स सोसायटी, विचारवेध यांच्या वतीने 'आवाज शांततेचा' कार्यक्रमात विद्यानंद बापट यांचा सत्कार ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्याप्रसंगी बापट बोलत होते. प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमित, अभिनेते सुमित राघवन, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी आणि कुमार नागे या वेळी उपस्थित होते.

बापट म्हणाले, 'सध्या पेठांमध्ये राहणे ही एक शिक्षा झाली आहे. सणांच्या काळात तर हे आणखी अवघड होत असेल तर उत्सवखोरांना शिक्षा झाली पाहिजे. पण, इथे शिक्षा सामान्य माणसांना होते. शांतता आणि निर्भयपणे जगणे हा मूलभूत अधिकार आहे. ध्वनिप्रदूषण आणि रहदारीस अडथळा याचे तार्किक समर्थन करता येत नाही. लाऊडस्पीकर हा उत्सवाचा अविभाज्य भाग कधीच नव्हता. मग ते धर्माची ढाल पुढे करतात. प्रथा परंपरा म्हणून कोणत्याही गोष्टी सुरू ठेवता येत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन ऐहिक समस्या सोडवण्यासाठी उपयोगी आहे.'

पालेकर म्हणाले, 'ध्वनिप्रदूषण आणि सामान्यांना होणारा त्रास याविषयी विद्यानंद बापट यांनी भाष्य केले. त्याचा परिणाम म्हणून मुंबई उच्च न्यायालयाने यामध्ये लक्ष घातले आहे. त्यांनी या भूमिकेचा पुनरुच्चार करत राहणे महत्त्वाचे आहे. विद्यानंदचे काम हा नागरिकाने व्यवस्थेविरुद्ध केलेल्या संघर्षाचे प्रतिनिधित्व करतो. संघर्ष करण्याची तयारी प्रत्येकाने ठेवली पाहिजे. नदीपात्रातील किंवा पादचारी मार्गावरचे अतिक्रमण, रस्ते दुरुस्ती, कचरा व्यवस्थापन अशा विषयांमध्ये वैयक्तिक पातळीवर विरोध केला पाहिजे.'

चिन्मयी सुमित म्हणाल्या, समाजामध्ये अविवेकी गोंधळ असताना काहीतरी करायला हवे असे वाटते. माझी पिढी विचारच करत बसली. विद्यानंद आपल्या भूमिकेपासून ढळत नाही. गरज असेल किंवा नसेल तरीही सोबतीची खात्री देते.' सुमित राघवन म्हणाले, संस्कृत आणि संस्कृतीपेक्षा सुसंस्कृत असणे महत्त्वाचे आहे. शांतता हा शब्द केवळ पुस्तकात राहिला आहे. विचारांची पातळी खालावली. आवाजाची पातळी वाढली. प्रत्येकामध्ये विद्यानंद आहे. फक्त ते बोलण्याचे तो धाडस करत नाही. हे खूप आधी करायला हवे होते. हा जागर वाढत रहावा.

# नवी सांगवीत २९ सप्टेंबरला "रोजगार महाकुंभ"

## रोजगार महाकुंभातून मिळणार करिअरच्या नव्या संधी : आमदार जगताप

**महाईन्यूज ।**
पिंपरी-चिंचवड

**नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६' आयोजित करण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी त्वरित नोंदणी करून रोजगाराची संधी मिळवण्यासाठी महाकुंभात सहभागी व्हावे," असे आवाहन चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी केले आहे.**

वैश्विक नेतृत्व, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त हा रोजगार मेळावा मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी दि न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूल, नवी सांगवी येथे होणार आहे.या रोजगार महाकुंभात विविध क्षेत्रांतील नोकरीच्या संधींची माहिती, कंपन्यांशी थेट संवाद आणि रोजगार मार्गदर्शन उपलब्ध होणार असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले.

> "पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील आपल्या तरुण-तरुणींना त्यांच्या कौशल्यानुसार रोजगाराच्या सर्वोत्तम संधी एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात, हा या 'रोजगार महाकुंभा'चा मुख्य उद्देश आहे. नामांकित कंपन्यांशी थेट संवाद साधून स्वतःच्या करिअरला नवी दिशा देण्याचे हे एक प्रभावी व्यासपीठ ठरेल. परिसरातील सर्व पात्र आणि इच्छुक युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि मोठ्या संख्येने सहभागी व्हावे."
>
> - शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ.

करिअरची पुढील दिशा ठरवण्यासाठी आवश्यक माहितीही युवक-युवतींना एकाच ठिकाणी मिळणार आहे. इच्छुक तरुण तरुणींनी अधिक माहितीसाठी 99210 99214, 73500 79955 किंवा 75759 81111 या क्रमांकावर तसेच HTTPS://DOCS.GOOGLE.COM/FORMS/D/1AC8EM2RSTBW6ZH6N9VO2K6TRJKHABEGRQRM7KCFIOGG/VIEWFORM?EDIT_REQUESTED=TRUE या लिंकवर नावनोंदणी करावी आणि कार्यक्रमाला येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




## मनोरंजनातून व्यसनमुक्तीचा संदेश; MITACSCच्या NSS पथकाचा उपक्रम



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नशामुक्त भारत अभियान आणि "परार्थ – LET'S BRING A SMILE ON SOMEONE'S FACE" या उपक्रमांतर्गत MIT ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE (MITACSC), आळंदीच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) पथकातर्फे HOPE MENTAL REHABILITATION AND DE-ADDICTION CENTRE, भोसरी येथे दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी मनोरंजनात्मक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

"मनोरंजनातून जनजागृती" या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाचा उद्देश व्यसनमुक्ती केंद्रातील रहिवाशांना आनंदाचे क्षण देण्यासोबतच व्यसनमुक्ती, व्यसनांचे दुष्परिणाम आणि व्यसनापासून दूर राहण्याबाबत जनजागृती करणे हा होता.कार्यक्रमाचे उद्घाटन NSS कार्यक्रम अधिकारी अरविंद वागसकर आणि HOPE MENTAL REHABILITATION AND DE-ADDICTION CENTREचे संचालक डॉ. विजय मोरे यांच्या उपस्थितीत झाले. NSS स्वयंसेवकांनी गणेश वंदना, व्यसनमुक्तीवर आधारित पथनाट्य, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाटिका, भजन, पोवाडा, गीते आणि कविता अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

सांस्कृतिक कार्यक्रमांमधून मनोरंजनासोबतच व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. कार्यक्रमामुळे केंद्रातील रहिवाशांमध्ये उत्साहाचे व सकारात्मक वातावरण निर्माण झाले. तसेच नशामुक्त भारत अभियानाच्या उद्दिष्टांशी सुसंगतपणे व्यसनमुक्त आणि निरोगी समाजनिर्मितीचा संदेश देण्यात आला. केंद्रातील रहिवाशांशी झालेला संवाद हा NSS स्वयंसेवकांसाठीही एक महत्त्वपूर्ण शिकण्याचा अनुभव ठरला. या उपक्रमातून स्वयंसेवकांमध्ये सहानुभूती, संवेदनशीलता आणि व्यसनाधीनतेच्या समस्येविषयी जागरूकता निर्माण झाली. काही रहिवाशांनी आपले अनुभव स्वयंसेवकांसोबत शेअर केले आणि सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश दिला. MIT ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, आळंदीचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी NSS पथकाला मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. समाजाप्रती असलेल्या जबाबदारीच्या भावनेतून आणि नशामुक्त भारत अभियानाला हातभार लावणाऱ्या अशा उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले. भविष्यातही समाजोपयोगी व जनजागृतीपर उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

मनोरंजन, संवाद आणि प्रबोधनाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश देत NSS स्वयंसेवकांनी नशामुक्त भारताच्या संकल्पनेला सकारात्मक योगदान दिले.





## भूमिका

# ग्राहकांच्या खिशाला दिलासा, भुलवणाऱ्या सवलतींना चाप

**सणासुदीचा हंगाम सुरू झाला की ऑनलाइन बाजारपेठांवर सवलतींचा अक्षरशः पाऊस पडतो. ४०, ५०, अगदी ७० टक्क्यांपर्यंत सूट देत असल्याचे सांगितले जाते. 'मूळ किंमत' पाच हजार रुपये आणि 'सेल प्राइस' तीन हजार रुपये, म्हणजे ग्राहकाची दोन हजार रुपयांची बचत, असे गणित दाखवले जाते.**

मात्र या गणितातील खरी मेख 'मूळ किमती'त असते. ती वस्तू प्रत्यक्षात कधी त्या किमतीला विकली गेली होती का, की सवलत मोठी दिसावी म्हणून आधीच किंमत फुगवण्यात आली, हा प्रश्न ग्राहकाला पडतो.

याच दिशाभूल करणाऱ्या पद्धतींना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कन्झ्युमर प्रोटेक्शन (ई-कॉमर्स) (अमेंडमेंट) रूल्स, २०२६ अधिसूचित केले आहेत. हे नियम १ जानेवारी २०२७पासून लागू होणार आहेत. नव्या नियमांनुसार सवलत दाखवताना विक्रेत्याला सवलतीची किंमत आणि 'प्रायर प्राइस' दोन्ही स्पष्टपणे दाखवावे लागतील. विशेष म्हणजे ही 'प्रायर प्राइस' विक्रेत्याच्या इच्छेनुसार ठरवता येणार नाही.




सवलत जाहीर करण्यापूर्वीच्या ३० दिवसांतील त्या वस्तूची सर्वात कमी किंमत हा त्यासाठीचा आधार असेल. यामुळे २ हजार रुपयांना नियमितपणे विकली जाणारी वस्तू आधी ४ हजार रुपये दाखवून नंतर '५० टक्के सवलत' देण्याच्या क्लृप्तीला चाप बसू शकतो. ग्राहकाला खरोखर किती बचत होत आहे, याची अधिक स्पष्ट कल्पना येईल. सवलतींचा बाजार संपवणे हा या नियमांचा उद्देश नाही; तर सवलतीच्या नावाखाली होणारी दिशाभूल थांबवणे हा त्यामागचा हेतू आहे. नियम केवळ किमतीपुरते मर्यादित नाहीत. ग्राहकाने केलेल्या शोधाशी संबंधित नसलेली उत्पादने वर आणणे, पैसे देऊन शोधपरिणामांमध्ये स्थान मिळवणाऱ्या उत्पादनांना नैसर्गिक निकालांसारखे दाखवणे यावरही निर्बंध असतील.

अशा उत्पादनांना 'स्पॉन्सर्ड' अशी स्पष्ट ओळख द्यावी लागेल. 'डार्क पॅटर्न्स'विरोधी मार्गदर्शक सूचनांचे पालनही बंधनकारक करण्यात आले आहे. बनावट काउंटडाउन, कृत्रिम तातडी निर्माण करणे किंवा ग्राहकाने न मागितलेली सेवा आधीच निवडून ठेवणे यांसारख्या पद्धतींवरही लक्ष ठेवले जाणार आहे. या बदलाची गरज ग्राहकांच्या तक्रारींमधून स्पष्ट होते. २०२५ मध्ये नॅशनल कन्झ्युमर हेल्पलाइनकडे १७ लाखांहून अधिक तक्रारी आल्या असून त्यापैकी सुमारे २९ टक्के तक्रारी ई-कॉमर्सशी संबंधित होत्या.

त्यामुळे पारदर्शकता आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे आवश्यकच आहे. मात्र नियम करणे आणि त्यांची काटेकोर अंमलबजावणी होणे यात मोठा फरक आहे. ग्राहकांनीही केवळ सवलतीची टक्केवारी पाहून खरेदी न करता किंमत इतिहास, उत्पादनाची माहिती, परतावा आणि हमीच्या अटी तपासल्या पाहिजेत. ऑनलाइन बाजारातील हा प्रयोग यशस्वी झाला, तर संदर्भ किमतीबाबतची पारदर्शकता ऑफलाइन बाजारातही आणण्याचा विचार व्हायला हवा.

सवलत ही ग्राहकाचा अधिकार नसला तरी स्पर्धात्मक बाजाराचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र सवलतीच्या नावाखाली भ्रम निर्माण करून ग्राहकाची निवड प्रभावित होत असेल, तर त्या बाजारपेठेला लगाम आवश्यक आहे. नव्या नियमांची खरी कसोटी त्यांच्या अंमलबजावणीत आहे. ग्राहकाला 'सवलत किती?' एवढेच नव्हे, तर 'सवलत खरी किती?' हे समजले पाहिजे.

## प्रासंगिक »

# दोन माठ

**एका गावात एक कुंभार राहत होता. त्याच्याकडे पाणी आणण्यासाठी दोन माठ होते. त्यातील एक माठ मजबूत होता, तर दुसऱ्याला छोटासा तडा गेला होता. कुंभार रोज नदीवरून पाणी भरून आणत असे.**

तडा गेलेल्या माठातून वाटेत थोडे पाणी गळत असे. एके दिवशी त्या माठाला वाईट वाटले. तो कुंभाराला म्हणाला, "माझ्यात तडा असल्यामुळे तुमचे अर्धे पाणी वाया जाते. माझ्यामुळे तुमचे नुकसान होते."

कुंभार हसला आणि म्हणाला, "तुला वाटेत फुललेली फुले दिसतात का?" माठाने होकार दिला. कुंभार म्हणाला, "तुझ्या तड्यातून गळणाऱ्या पाण्यामुळेच त्या वाटेवर मी फुलांची बीजे पेरली होती. तुझ्यामुळे रोज त्या फुलांना पाणी मिळते. आज त्यांचा सुगंध संपूर्ण रस्त्यावर दरवळतो."

माठाला आपली उणीवही कोणाच्या तरी उपयोगी पडू शकते, हे समजले. त्याने स्वतःला दोष देणे सोडून दिले.

- तात्पर्य : प्रत्येक उणीव ही कमजोरी नसते; योग्य उपयोग केला तर तिच्यातूनही सुंदर परिणाम घडू शकतो.

साहेब, नमस्कार! गणपती बाप्पा यंदा अनेक गावांतून कोरडेच परतले. पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या डोळ्यांत चिंता असताना 'सुखकर्ता, दुःखहर्ता' म्हणून पूजल्या जाणाऱ्या बाप्पांनी जाताना दुष्काळाचे सावट मागे ठेवले.

# दुष्काळ शेतकऱ्यांचा, पॅकेजचा उत्सव राजकारण्यांचा!



मात्र दुष्काळ जाहीर करण्याच्या आणि त्यासाठी पॅकेज मागण्याच्या राजकीय हालचालींना आता वेग येणार असल्याने काहींच्या चेहऱ्यावर मात्र समाधान दिसू लागले असेल. दुष्काळ म्हणजे शेतकऱ्यांसाठी पाणी, चारा, पिकांचे नुकसान आणि जगण्याचा प्रश्न. पण प्रशासन आणि राजकारणाच्या व्यवस्थेत तो बैठका, दौरे, पाहणी, पंचनामे आणि पॅकेजचा विषय बनतो. पाहणी दौरे सुरू होतील. मंत्री, सचिव आणि अधिकारी गावोगावी जातील. त्यांच्या स्वागताची तयारी होईल. बॅनर लागतील, गर्दी जमवली जाईल आणि कोणत्या मार्गाने दौरा नेला तर 'सगळे काही नियंत्रणात' दिसेल, याचे नियोजन केले जाईल. मात्र खरी परीक्षा तिथेच आहे. दुष्काळग्रस्त भागात आलेल्या पथकाला फक्त ठरवून दिलेली दृश्ये दाखवायची की शेतकऱ्यांची खरी परिस्थितीही समोर आणायची? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण दुष्काळाच्या पाहणीपेक्षा दुष्काळाचा पंचनामा आणि त्यानंतर मिळणारी मदत अधिक महत्त्वाची आहे.

पॅकेज जाहीर झाल्यानंतर त्याचे वाटप कोणाला, किती आणि कधी होणार, यासाठी पुन्हा बैठका होतील. त्या वेळी मात्र राजकीय गटबाजीला वाव मिळू नये. कोणता शेतकरी कोणत्या गटाचा, कोणता सरपंच कोणाच्या जवळचा, आमदार-खासदाराचा माणूस कोण, यापेक्षा नुकसानग्रस्त कोण आहे, हा एकमेव निकष असायला हवा. दुष्काळ सर्वांसाठी समान असतो; त्याला पक्षाची सीमा नसते. त्यामुळे सत्ताधारी असो वा विरोधक, प्रत्येक शेतकऱ्याला समान मदत मिळणे आवश्यक आहे. सरकारवर प्रश्न विचारणारा शेतकरी असला तरी तो दुष्काळग्रस्तच असतो. त्याचा आवाज दाबण्याऐवजी तो प्रशासनाच्या अहवालात पोहोचणे गरजेचे आहे. पंचनामे गावनिहाय आणि कालबद्ध पद्धतीने झाले पाहिजेत.

किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले, किती मदत मंजूर झाली आणि प्रत्यक्ष किती रक्कम वितरित झाली, याची अधिकृत माहिती सार्वजनिक झाली पाहिजे. ग्रामपंचायतीपासून जिल्हा प्रशासनापर्यंत ही माहिती पारदर्शकपणे उपलब्ध असणे आवश्यक आहे. दुष्काळ हा कुणाच्या राजकीय प्रसिद्धीचा उत्सव नसून शेतकऱ्याच्या जगण्याचा प्रश्न आहे. त्यामुळे पाहणी दौरा 'यशस्वी' होण्यापेक्षा शेतकऱ्याला प्रत्यक्ष मदत मिळणे महत्त्वाचे आहे.

दुष्काळाचे पॅकेज मोठे मिळावे, ही अपेक्षा रास्त आहे; पण त्याहून मोठी अपेक्षा अशी की त्या पॅकेजचा प्रत्येक रुपया खऱ्या दुष्काळग्रस्तापर्यंत पोहोचावा. वेळी निदान दुष्काळाच्या नावावरचे राजकारण बाजूला ठेवून शेतकऱ्याच्या वेदनेचा पंचनामा होऊ द्या. पॅकेज मिळेलच; पण ते योग्य हातात आणि योग्य वेळी पोहोचले, तरच त्या पॅकेजला खऱ्या अर्थाने 'दुष्काळ निवारण' म्हणता येईल.

## ।। अभंगवाणी ।।



युक्ताहार न लगे आणिक साधनें ।
अल्प नारायणें दाखविलें ॥१॥

कलियुगामाजी करावें कीर्तन ।
तेणें नारायण देइल भेटी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘व्होट चोरी नाही, यांचा मेंदू चोरीला गेलाय’

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची राहुल गांधींसह विरोधकांवर टीका

महाईन्यूज । मुंबई

**केंद्रीय निवडणूक आयोगातील मतभेदाची बातमी समोर आली आणि त्यानंतर देशभरात मोठी खळबळ उडाली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मनमानीपणे निर्णय घेतल्याची बातमी द इंडियन एक्सप्रेसने दिली. त्यानंतर ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. या घडामोडीनंतर अखेर निवडणूक आयोगाच्या तिन्ही आयुक्तांनी संयुक्त निवेदन जारी करत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.**



केंद्रीय निवडणूक आयोगातील मतभेदाच्या पार्श्वभूमीवर बोलताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जोरदार टीका केली होती. आता या टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. ‘व्होट चोरी नाही, तर यांचा मेंदूच चोरीला गेला आहे’, अशी खोचक टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यासह विरोधकांवर केली आहे.

“राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा फेक नरेटीव्ह फेल झालेला आहे. संविधान हातामध्ये घेऊन राहुल गांधी दररोज संवैधानिक संस्थांवर वेगवेगळे आरोप करायचे. ते संवैधानिक संस्थांवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचं काम करत आहेत. लोकांचा त्यावरचा विश्वास उडवायचा यासाठी ते प्रयत्न करत आहेत. राहुल गांधी संविधान दाखवत असले तरी त्यांना या संविधानाने दिलेली लोकशाही मान्य नाहीये”, अशी टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

“माझं तर असं स्पष्ट मत आहे की राहुल गांधी यांना संवैधानिक संस्थांवर प्रश्न उपस्थित करून हळूहळू भारतीय संविधानावर प्रश्न उपस्थित करायचे आहेत. कारण आता राहुल गांधी यांची मानसिकता कम्युनिस्ट, साम्यवादी आणि अतिडावी झालेली आहे”, अशी टीका फडणवीस यांनी केली.

“राहुल गांधी यांना भारतात अतिडावी राजवट आणायची आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेमधील त्यांच्या शेवटच्या भाषणात एक शंका व्यक्त केली होती. ज्या प्रकारची अराजकता तयार केली जाऊ शकते हे त्यांनी सांगितलं होतं ते आज राहुल गांधी करताना स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे या संविधानावरील लोकांचा विश्वास उठला पाहिजे असा प्रयत्न राहुल गांधी करत आहेत”, अशी टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

### फडणवीसांचा विरोधकांवर टोला

“विरोधक व्होट चोरी झाली असं म्हणत आहेत. मात्र, यांचा मेंदू चोरीला गेलेला आहे. मी आता पंतप्रधान मोदी यांना विनंती करणार आहे की एखादी अशी चौकशी समिती तयार करता येईल का? जी विरोधकांना त्यांचा मेंदू परत आणून देईल. जो यांचा मेंदू चोरीला गेलेला आहे किंवा त्यांनी तो गहाण ठेवलेला आहे. तो त्यांचा मेंदू त्यांना परत मिळेल अशी काही व्यवस्था करता येईल का अशी माझी मागणी आहे”, अशी खोचक टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

# मध्यरात्री सार्वजनिक शौचालयात गेले अन् गुदमरले, मुंबईत दोघांचा करुण अंत

महाईन्यूज । मुंबई

**मुंबईतील गोरेगाव पूर्व भागात रविवारी पहाटे एका सार्वजनिक शौचालयातून आलेल्या तीव्र रासायनिक वासामुळे गुदमरून दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.**






मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना राम मंदिर (पूर्व) येथील मृणालताई पुलाजवळ असलेल्या पारशी पंचायत गेटपाशी घडली. पालिकेने या मृत तरुणांची ओळख प्रभाकर धनीवार (२४) आणि भावीन देसाई (१८) अशी पटवली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास दोघांनाही ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तिथे डॉक्टरांनी पहाटे ३.४९ वाजता त्यांना मृत घोषित केले.

सार्वजनिक शौचालयातून तीव्र रासायनिक दुर्गंधी येत असल्याचं आणि त्यामुळे दोन जण गुदमरल्याचं स्थानिक रहिवाशांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने प्रशासनाला याची माहिती दिली. या प्रकरणी वनराई पोलिसांनी सध्या अकस्मात मृत्यूची नोंद केली असून, मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी ते शवविच्छेदन अहवालाची वाट पाहत आहेत.

“प्राथमिकदृष्ट्या, शौचालयाजवळ असलेल्या एका लहान कारखान्यातून बाहेर पडलेला वायू या दोन व्यक्तींच्या संपर्कात आल्याचं दिसून येत आहे”, असं एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं. या मृत्यूप्रकरणी पीडितांच्या कुटुंबियांनी कडक कारवाईची मागणी केली आहे. “ते दोघेही आम्हाला स्वच्छतागृहात बेशुद्ध अवस्थेत आढळले, त्यांचे ओठ काळे पडले होते आणि तोंडाला फेस आला होता”, अशी माहिती प्रभाकर धनीवार यांचे भाऊ प्रभात धनीवार यांनी दिली.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही घटना सकाळी साडेआठच्या सुमारास प्रशासनापर्यंत पोहोचली. त्यानंतर तात्काळ अग्निशामक दल, पोलीस, १०८ रुग्णवाहिका सेवा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) आणि पालिकेच्या वॉर्ड कर्मचाऱ्यांचे पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले. हे पथक शौचालय परिसराची तपासणी करून या रासायनिक वासाचा मुख्य स्त्रोत शोधून काढणार आहे. या प्रकरणाच्या सखोल चौकशीनंतरच घटनेचा नेमका क्रम आणि मृत्यूचे कारण स्पष्ट होईल.

दरम्यान,याप्रकरणी मुंबई महानगपालिकेच्या महापौर रितू तावडे यांनीही प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, “गोरेगावात झालेल्या दोन मृत्यूंप्रकरणी चौकशी सुरू आहे. रासायनिक द्रव्यांमुळे हे मृत्यू झाले का याची तपासणी केली जाईल. त्यांची प्रकृती कशी होती, त्यांनी काही प्राशन केलं होतं का? याचा तपास केला जाईल.”

# ‘होर्मुझ’चा उल्लेख ‘ट्रम्प स्ट्रेट’

## अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून समाजमाध्यमावर नवा नकाशा

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ‘ट्रुथ सोशल’या आपल्या समाजमाध्यमावर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीचा एक नकाशा प्रसिद्ध केला असून, त्यावर या हॉर्मुझच्या सामुद्रधुनीचा उल्लेख ‘ट्रम्प स्ट्रेट’ असा केला आहे. इराणने अमेरिकेसमोर काही अटी ठेवून आठवड्याभरात हा जलमार्ग खुला करण्याचा प्रस्ताव दिल्यानंतर ट्रम्प यांची ही पहिली सार्वजनिक प्रतिक्रिया समोर आली आहे. इराणने अमेरिकन नाकेबंदी उठवणे, इराणच्या तेल विक्रीवरील निर्बंध शिथिल करणे आणि लेबनानसह युद्धबंदी लागू करणे या अटींवर हा मार्ग खुला करण्याची तयारी दर्शवली होती. या प्रस्तावावर अमेरिकन मध्यस्थांशी सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे व्हाईट हाऊसने म्हटले आहे.**



दरम्यान, इराणी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर जागतिक नेत्यांची बैठक आणि त्यादरम्यान अमेरिकेसोबत झालेली अप्रत्यक्ष चर्चा आटोपून इराणचे अध्यक्ष पेझेश्कियान न्यूयॉर्कहून तेहरानकडे रवाना झाले आहेत. आमसभेतील भाषणात त्यांनी ट्रम्प यांच्या इराण नष्ट करण्याच्या धमक्यांचा निषेध केला, मात्र कुटनीती आणि चर्चेचे मार्ग खुले असल्याचे स्पष्ट केले.

वेस्ट बँकेतील इस्रायली नागरिकांनी नैसर्गिक पाण्याचे झरे आणि वारसा स्थळांवर ताबा मिळवण्याचे प्रयत्न तीव्र केले आहेत. हे झरे पिण्याच्या पाण्यासाठी, पर्यटनासाठी आणि शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत आणि तेथे राहणाऱ्या २८ लाख पॅलेस्टिनी लोकांसाठी ते अधिकाधिक दुर्गम होत आहेत. जॉर्डन व्हॅलीमध्ये एका ऑपरेटरने पॅलेस्टिनी गावाकडे जाणारी पाण्याची पाईपलाईन कापली आणि ती एका तलावाकडे वळवली.

### हुतींचा क्षेपणास्त्र हल्ला उधळला

येमेनमधील इराणसमर्थित हुती बंडखोरांनी डागलेले बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हवेतच नष्ट केल्याचा दावा सौदी अरेबियाचे लष्करी प्रवक्ते, मेजर जनरल तुर्की अल-मल्की यांनी शनिवारी पहाटे केला. हे क्षेपणास्त्र खामिस मुशायत शहराच्या दिशेने डागण्यात आले होते, असे त्यांनी सांगितले. या वाढत्या हल्ल्यांचा गल्फ कोऑपरेशन कौन्सिलने तीव्र निषेध करत आंतरराष्ट्रीय समुदायाला कठोर पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

---

## लखनौ-आग्रा एक्सप्रेसवेवर थरार! उलटलेल्या कारमधून ५ प्रवाशांची सुखरूप सुटका

**महाईन्यूज । उत्तर प्रदेश**

**सध्या सोशल मीडियावर अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. यामध्ये अनेक व्हिडीओ हे अपघाताचे असतात. अपघाताच्या घटनांचे काही व्हिडीओ अंगावर काटा आणणारे असतात तर काही व्हिडीओ पाहून थरकाप उडतो. आता अशाच एका अपघाताच्या घटनेचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे.**





लखनौ-आग्रा एक्सप्रेसवेवर एक अपघाताची घटना घडली. मात्र, या घटनेनंतर पोलीस कॉन्स्टेबल असलेल्या एका दाम्पत्याने मोठं धैर्य आणि तत्परता दाखवत कारमध्ये अडकलेल्या पाच जणांची सुखरूप सुटका केली. कारमध्ये अडकलेल्यांची मदत करण्यासाठी या पोलीस दाम्पत्याने त्यांच्याकडे असलेल्या रायफलने गाडीच्या खिडक्या फोडल्या आणि ५ जणांचे प्राण वाचवले आहेत. त्यांच्या या बचावकार्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

लखनौ-आग्रा एक्सप्रेसवेवर एका भरधाव फॉर्च्युनर कारला अपघात झाला आणि ही कार उलटली. या कारमध्ये ५ जण होते. या अपघाताची घटना पाहून पोलीस कॉन्स्टेबल असलेल्या एका दाम्पत्याने धैर्य आणि तत्परता दाखवत त्या पाच जणांची सुखरूप सुटका केली. ही घटना उत्तर प्रदेशातील लखनौ-आग्रा एक्सप्रेसवेवर घडली.

झालं असं की, कॉन्स्टेबल अमित तेवतिया हे त्यांची पत्नी अर्चना सिंगसह कन्नौजच्या दिशेने जात होते. यावेळी त्यांना रस्त्याच्या कडेला एक कार अचानक उलटलेली दिसली. हे पाहून या दाम्पत्याने लगेच आपली कार थांबवली आणि उलटलेल्या कारकडे मदतीसाठी धाव घेतली. त्या गाडीमधून मदतीसाठी आवाज ऐकू येत होता. हे पाहून पोलीस कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी प्रयत्न सुरू केले. मात्र, त्यांना त्या आतमध्ये अडलेल्या लोकांना बाहेर काढता येईना.

त्यामुळे या दाम्पत्याने तत्परता दाखवत हातातील सर्व्हिस रायफलचा वापर केला आणि कारच्या खिडक्या फोडल्या, त्यानंतर काही वेळाने कारमधील पाचही जणांना एकेक करून सुरक्षित बाहेर काढण्यात आलं. अपघातात जखमी झालेल्या या पाचही जणांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

या घटनेतील बचावकार्याचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून अनेकांनी त्या कॉन्स्टेबल दाम्पत्याने दाखवलेले धैर्य, तत्परता आणि प्रसंगावधानाचं कौतुक केलं आहे.



# सुपरहिरोच्या भूमिकेत दिसणार आमिर खान

आमिर खान एका नव्या सुपरहीरो चित्रपटासाठी निर्माता साजिद नाडियाडवाला आणि दिग्दर्शक आर. बाल्की यांच्यासोबत चर्चा करत आहे. हा चित्रपट सध्या प्रारंभिक टप्प्यात असून याच्या पटकथेवर काम सुरू आहे. आमिर खानला या प्रोजेक्टसाठी निवडण्यात आले असून त्यानेही याकरता रुची दाखविली आहे.

आगामी काही महिन्यांमध्ये याची कहाणी, संवाद आणि मुख्य पात्र तयार करण्यावर काम केले जाईल. हा चित्रपट व्यापक स्तरावर निर्माण करण्याची योजना असल्याने याचा लुक आणि प्रॉडक्शन डिझाइनवरही विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

आमिर खान हा कुठलाही चित्रपट स्वीकारण्यापूर्वी त्याच्या पटकथेला वेळ देतो. कहाणी पूर्णपणे पसंत पडली तरच तो होकार देतो. अशास्थितीत चित्रपटावरून आमिर आणि निर्मात्यांदरम्यान सातत्याने चर्चा होत राहतेत. आमिर आणि साजिद दीर्घकाळापासून मित्र आहेत, परंतु दोघांनी आतापर्यंत कुठल्याही चित्रपटासाठी एकत्र काम केलेले नाही.

तर आर. बाल्की हे वेगळया प्रकारच्या चित्रपटांसाठी ओळखले जातात. त्यांनी 'चिनी कम', 'पा', 'की अँड का', 'पॅडमॅन' आणि 'चुप : रिवेंज ऑफ द आर्टिस्ट' यासारख्या चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. अशास्थितीत आमिरसोबत त्यांचा या सुपरहीरो प्रोजेक्ट धाटणीपेक्षा काहीसा वेगळा असू शकतो.

# मेधा पुन्हा चर्चेत



बॉलिवूड अभिनेत्री मेधा शंकर सध्या तिच्या खाजगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. प्रसिद्ध कॉमेडियन समय रैनासोबत तिचे नाव गेल्या काही काळापासून जोडले जात आहे. दोघे लवकरच लग्न करणार असल्याच्या अफवाही सोशल मीडियावर पसरल्या होत्या. मात्र, या चर्चांवर मेधा आणि समय यांनी प्रतिक्रिया देत अफवांना पूर्णविराम दिला होता. आता मेधा शंकरचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, त्यामुळे त्यांच्या कथित नात्याची पुन्हा चर्चा रंगली आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये मेधा एका कारमधून बाहेर पडताना दिसत आहे. ही कार समय रैनाची असल्याचा दावा सोशल मीडियावर केला जात आहे. कारमधून उतरल्यानंतर मेधा पुढे जात असताना तिची नजर पापाराझींवर पडते. कॅमेरे पाहताच ती काहीशी घाबरलेली दिसते आणि त्यानंतर एका इमारतीत जाताना दिसते. या व्हिडिओमुळे नेटकऱ्यांकडून विविध अंदाज बांधले जात आहेत. मेधा शंकर आणि समय रैना एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आल्यानंतर समय रैनाने त्याच्या नेहमीच्या विनोदी शैलीत या चर्चांवर सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत प्रतिक्रिया दिली होती. समयने इंस्टाग्राम स्टोरीवर मेधा शंकरला टॅग करत म्हटले होते की, "डिसेंबरमध्ये माझा भारत दौरा आहे. माफ कर, मेधा, आपल्याला तो पुढे ढकलावा लागेल." मेधा शंकर ज्या कारमधून खाली नेमक्या कोणत्या कारणासाठी उतरली आणि ज्या घरात ती गेली त्याविषयी देखील अनेक तर्क वितर्क लावणे जात आहेत. त्यामुळे दोघांच्या कथित नात्याच्या चर्चांना पुन्हा सुरुवात झाली आहे.



# शाहरुख खानची संपत्ती घटली

बॉलिवूड आणि उद्योगविश्वातील श्रीमंतांची 'हुरुन इंडिया रिच लिस्ट २०२६' जाहीर झाली आहे. या यादीत बॉलिवूडचा 'किंग' शाहरुख खान पुन्हा एकदा भारतातील सर्वात श्रीमंत अभिनेता ठरला आहे. मात्र, यंदाच्या यादीतील धक्कादायक बाब म्हणजे, देशातील सर्वाधिक श्रीमंत अभिनेता असूनही शाहरुख खानच्या संपत्तीत गत एका वर्षात मोठी घट झाली आहे. हुरुनच्या ताज्या आकडेवारीनुसार, शाहरुख खानची यंदाची अंदाजित संपत्ती १०,००० कोटी रुपये आहे. गेल्या वर्षी त्याची संपत्ती १२,४९० कोटी रुपये इतकी असल्याचे नमूद करण्यात आले होते. म्हणजेच, वर्षभरात शाहरुख खानच्या संपत्तीत तब्बल २,४९० कोटी रुपयांची घट झाली आहे. मात्र, संपत्तीत मोठी घट होऊनही शाहरुखने भारतातील सर्वात श्रीमंत अभिनेता म्हणून आपले स्थान कायम राखले आहे. शाहरुखची संपत्ती केवळ चित्रपटांमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर आधारित नाही. त्याचे विविध व्यावसायिक उपक्रम आणि गुंतवणुकीही त्याच्या एकूण संपत्तीचा महत्त्वाचा भाग आहेत. शाहरुख खानच्या संपत्तीमध्ये रेड चिलीज एंटरटेनमेंट आणि नाइट रायडर्स स्पोर्ट्स यांसह विविध व्यवसायांचा समावेश आहे. त्याच्या संपत्तीचे मूल्यांकन या व्यवसायांमधील हिस्सा, गुंतवणूक आणि इतर मालमत्तांच्या मूल्यावरही अवलंबून असते. या यादीत अमिताभ बच्चन हे भारतातील दुसरे सर्वात श्रीमंत अभिनेता ठरले आहेत. २०२६च्या यादीत त्यांची अंदाजित संपत्ती ४,००० कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तर, गेल्या वर्षी म्हणजेच २०२५च्या यादीत अमिताभ बच्चन यांची नेटवर्थ १,६३० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले होते. त्या तुलनेत यंदाच्या आकडेवारीत त्यांच्या संपत्तीत मोठी वाढ झाल्याचे दिसून येते.

# भारताच्या नावावर ३२ वे पदक!

## आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने 'स्क्वॅश'मध्ये मिश्र दुहेरीत जिंकले होते कांस्यपदक

महाईन्यूज । मुंबई

**भारताने आपले ३२ वे पदक निश्चित केले आहे. स्क्वॅशच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात अनाहत सिंगचा मलेशियाच्या शिवसंगरी सुब्रमण्यम हिच्याकडून ३-० असा पराभव झाला. शिवसंगरीने ११-४, ११-४, ११-७ अशा फरकाने सामना जिंकत सुवर्णपदक पटकावले. तर अनाहतला रौप्यवर समाधान मानावे लागले.**



शिवसंगरी जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असून, ती मागील आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती आहे. अनाहतविरुद्धचा तिचा हा सलग तिसरा विजय ठरला. मलेशियाने पुरुष आणि महिला एकेरी अशा दोन्ही प्रकारांत सुवर्णपदक जिंकले, तर भारताला दोन्हीमध्ये रौप्यपदक मिळाले. एनजी आणि शिवसंगरी यांनी यापूर्वी २०२३ च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत याच प्रकारांमध्ये सुवर्णपदके जिंकली होती.

भारताने आजचे पहिले पदक निश्चित केले आहे. अभय सिंगने पुरुष एकेरी स्क्वॅश प्रकारात रौप्यपदक जिंकले. अंतिम सामन्यात त्याला मलेशियाच्या एनजी ईन यो कडून ११-९, ११-५, ११-५ असा पराभव स्वीकारावा लागला. अभयचा ३-० असा पराभव झाला आणि एनजीने सुवर्णपदक जिंकले. या आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे ३१ वे आणि स्क्वॅशमधील दुसरे पदक आहे. याआधी, जोशना चिनप्पा आणि सेंथिलकुमार यांनी मिश्र दुहेरीत कांस्यपदक जिंकले होते.

भारताने रिकर्व्ह गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत उत्कृष्ट कामगिरी केली असून, पुरुष आणि महिला अशा दोन्ही संघांनी उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले आहे. पुरुष संघाने चीनचा ५-१ असा पराभव केला, तर महिला संघाने चायनीज तैपेईवर ६-० असा विजय मिळवला. उपांत्यपूर्व फेरीत चीनविरुद्ध भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाने दमदार खेळ करत ५-१ अशा फरकाने सामना जिंकला आणि उपांत्य फेरीतील आपले स्थान पक्के केले. महिला रिकर्व्ह संघाने चायनीज तैपेईविरुद्ध एकतर्फी सामना खेळत ६-० असा विजय मिळवला आणि अंतिम चारमध्ये (उपांत्य फेरीत) प्रवेश निश्चित केला. या विजयांसह, भारताचे पुरुष, महिला आणि मिश्र रिकर्व्ह संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. तिन्ही संघांचे उपांत्य फेरीतील सामने २ ऑक्टोबर २०२७ रोजी खेळवले जातील. आजची तिरंदाजी स्पर्धा येथे संपली असून, उद्यापासून वैयक्तिक कंपाऊंड प्रकारांना सुरुवात होईल.

### ट्रॅप शूटिंगमध्ये पुरुष संघ सातव्या स्थानावर

पुरुष ट्रॅप प्रकारात भारतीय नेमबाजांची कामगिरी आतापर्यंत साधारण राहिली आहे. वैयक्तिक गटात, कायनान चेनाई ४७ गुणांसह ११ व्या स्थानावर आहे. शपथ भारद्वाज ४५ गुणांसह २२ व्या, तर अहवर रिझवी ४१ गुणांसह ३५ व्या स्थानावर आहे. पुरुषांच्या ट्रॅप सांघिक क्रमवारीत भारतीय संघ सध्या सातव्या स्थानावर आहे. मात्र, स्पर्धेचे दोन दिवस बाकी असल्याने भारतीय नेमबाजांना आपली क्रमवारी सुधारण्याची संधी आहे. ट्रॅप प्रकारातील दोन दिवस अजून बाकी आहेत; आगामी फेऱ्यांमध्ये चांगली कामगिरी करून पदकाच्या शर्यतीत परतण्याचे लक्ष्य भारतीय नेमबाजांचे असणार आहे.

# २०२७ चा वर्ल्ड कप भारतासाठी माझा शेवटचा; विराट कोहलीचा निर्णय?

महाईन्यूज । नवी दिल्ली

**भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फलंदाज विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपल्या निवृत्तीबाबत मोठी घोषणा केली आहे. २०२७ मध्ये होणारा वनडे विश्वचषक हा भारताकडून खेळणारा आपला अखेरचा विश्वचषक असेल, असे कोहलीने स्पष्ट केले. त्यामुळे २०२७ च्या विश्वचषकानंतर तो वनडे क्रिकेटमधूनही निवृत्ती घेण्याची शक्यता आहे.**




JioStarशी बोलताना कोहलीने सांगितले की, परदेशातील परिस्थितीत खेळताना शरीरावर मोठा ताण येतो. त्यामुळे पुढील वनडे विश्वचषक आपल्यासाठी अखेरची संधी असल्याचे त्याने म्हटले. "भारतासाठी खेळणारा हा माझा शेवटचा विश्वचषक असेल. त्यामुळे मैदानावर माझ्याकडून सर्वस्व पणाला लावण्याची हीच माझी प्रेरणा आहे," असे कोहली म्हणाला.

५० षटकांच्या विश्वचषकातील तीव्रता इतर कोणत्याही स्पर्धेपेक्षा अधिक असल्याचेही त्याने नमूद केले. टी-२० सामन्यांच्या पातळीवरील तीव्रता सलग दहा सामन्यांमध्ये कायम ठेवणे मोठे आव्हान असते. एका दिवसात जवळपास अडीच टी-२० सामन्यांइतका खेळ होत असल्याने मोठ्या स्पर्धेत ही तीव्रता कायम राखणे कठीण असल्याचे कोहलीने सांगितले. इंग्लंड आणि वेल्समध्ये खेळल्या गेलेल्या २०१९ च्या वनडे विश्वचषकात कोहलीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ उपांत्य फेरीपर्यंत पोहोचला होता. उपांत्य फेरीपर्यंतच्या प्रवासात त्याने सलग पाच अर्धशतके झळकावली होती, जिथे भारताचा न्यूझीलंडकडून पराभव झाला.

२०२१ मध्ये वनडे संघाचे कर्णधारपद सोडल्यानंतर कोहलीने २०२३ चा विश्वचषक रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळला. या स्पर्धेत भारताने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली; मात्र ऑस्ट्रेलियाकडून पराभव झाल्याने भारताचे विश्वविजेतेपदाचे स्वप्न भंगले. या स्पर्धेत कोहलीने विक्रमी फलंदाजी करत ११ सामन्यांत ७६५ धावा केल्या. त्याची सरासरी ९५.६२ इतकी होती. त्याच्या या कामगिरीत तीन शतके आणि सहा अर्धशतकांचा समावेश होता. तो स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. २०२४ मध्ये भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर कोहलीने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.

### २०११ मध्ये विश्वचषक पदार्पण

२००८ मध्ये वनडे क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या कोहलीने २०११ मध्ये पहिल्यांदा विश्वचषकात सहभाग घेतला. पदार्पणाच्या विश्वचषकातच त्याने बांगलादेशविरुद्ध शतक ठोकत आपली छाप पाडली. श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याने ४९ चेंडूत ३५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तसेच गौतम गंभीरसोबत तिसऱ्या विकेटसाठी ८३ धावांची भागीदारी करत भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. भारताने तब्बल २८ वर्षांनंतर विश्वचषक उंचावला. २०१५ च्या विश्वचषकात संघातील वरिष्ठ खेळाडू म्हणून कोहलीने पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावत मोहिमेला सुरुवात केली. मात्र उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाकडून पराभव झाल्याने भारताचे आव्हान संपुष्टात आले.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
दि. 28 सप्टेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# २९ सप्टेंबरला मुंबईत 'निर्धार मोर्चा'

## अमित गोरखेंच्या नेतृत्वात मातंग समाजासह वंचित घटकांचा एल्गार; मुंबईत शक्तिप्रदर्शन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करून मातंग समाजासह इतर वंचित घटकांना शिक्षण, रोजगार आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये समान संधी मिळावी, या प्रमुख मागणीसाठी २९ सप्टेंबर रोजी मुंबईत 'निर्धार मोर्चा' काढण्यात येणार आहे. आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या मोर्चात राज्यभरातील विविध वंचित समाजघटक, सामाजिक संघटना, कार्यकर्ते, महिला आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.**



अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचावा, या मागणीसाठी राज्यभरात आतापर्यंत ७५ हून अधिक मोर्चे आणि आंदोलने झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या आंदोलनांच्या माध्यमातून शांततापूर्ण मार्गाने शासनाचे लक्ष वेधल्यानंतर आता मुंबईतील आझाद मैदानावर 'निर्धार मोर्चा' आयोजित करण्यात आला आहे. आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीला निर्णायक दिशा देण्यासाठी हा मोर्चा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे.

अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करून मातंग समाजासह इतर वंचित घटकांना न्याय्य वाटा मिळावा, ही मोर्चाची प्रमुख मागणी आहे. वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणात समान संधी, युवकांना रोजगाराच्या संधी आणि शासकीय भरती प्रक्रियेत न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येणार आहे.

मातंग, मादिगा, बुरूड, चर्मकार यांसह विविध वंचित समाजघटकांचे प्रतिनिधी, सामाजिक संघटना, कार्यकर्ते, महिला आणि युवक या मोर्चात सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. राज्याच्या विविध भागांतून मुंबईत येणारे समाजबांधव आझाद मैदानावर एकत्र येऊन आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी आपली भूमिका मांडणार आहेत.

राज्यभरातील आंदोलनांनंतर आता मुंबईत होणाऱ्या या 'निर्धार मोर्चा'च्या माध्यमातून अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा शासनासमोर ठामपणे मांडला जाणार असून, २९ सप्टेंबरच्या आंदोलनाकडे राजकीय आणि सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### वंचित घटकांना हक्क मिळणे गरजेचे

"आरक्षणाचा मूळ उद्देश सर्वांचा सर्वांगीण विकास हा आहे. मात्र, अनुसूचित जातीतील काही विशिष्ट घटकांना अद्याप आरक्षणाचा अपेक्षित लाभ मिळालेला नाही. शिक्षण, नोकरी आणि रोजगाराच्या संधींपासून कोणताही वंचित घटक दूर राहू नये, यासाठी आरक्षणाचे उपवर्गीकरण होणे गरजेचे आहे," असे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले. "राज्यभरात ७५ हून अधिक मोर्चांच्या माध्यमातून आम्ही शांततापूर्ण मार्गाने आमचा आवाज शासनापर्यंत पोहोचवला आहे. आता २९ सप्टेंबरचा मुंबईतील 'निर्धार मोर्चा' हा आमच्या हक्काची, समान संधीची आणि न्यायाची मागणी अधिक तीव्रतेने मांडणारा टप्पा आहे," असेही गोरखे यांनी स्पष्ट केले.

# विद्यार्थ्यांनी रेखाटला 'स्वप्नातला भारत'; भारतीय जैन संघटनेच्या शाळेत चित्रकला उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर राबविण्यात आलेल्या 'स्वप्नातला भारत' या उपक्रमांतर्गत भारतीय जैन संघटनेच्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी विशेष चित्रकला कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टी संत तुकाराम नगरच्या वतीने करण्यात आले होते. कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांच्या वाढदिवसाचे (दि.26) औचित्य साधून हा उपक्रम घेण्यात आला.**



या कार्यक्रमात शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पनेतील भारत चित्रांच्या माध्यमातून साकारला. विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांमधून विकसित, सक्षम आणि प्रगत भारताचे स्वप्न मांडण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त लाडू-चिवडा व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य देशमुख सर, उपप्राचार्य जाधव सर, यादव सर, भारतीय जनता पक्षाचे कोअर कमिटी सदस्य सदाशिवराव खाडे, माजी नगरसेवक तथा भाजप महिला मोर्चाच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सुजाताताई पालांडे यांच्यासह मंगेश धाडगे, महेंद्र बाविस्कर, अभय फाळके, राहुल खाडे, अमोल घोरपडे, दीपक पाटील, दिनेश पाटील, जयदेव अक्कलकोटे, तात्याराव गायकवाड, राहुल शितोळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कामगारनेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, "उद्याचा भारत म्हणजे तुम्ही विद्यार्थी आहात. भारताचे नाव जागतिक स्तरावर उंचावण्यासाठी तुम्हीही मोठे ध्येय ठेवले पाहिजे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून दिली आहे. त्याचप्रमाणे तुम्हीही भविष्यात मोठे होऊन देशाची मान जगात उंच करा."

विशेषतः दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी आगामी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सदाशिवराव खाडे, सुजाताताई पलांडे आणि प्राचार्य देशमुख सर यांनी यशवंतभाऊ भोसले यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

'स्वप्नातला भारत' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व्यासपीठ देतानाच देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी नव्या पिढीमध्ये सकारात्मक विचार रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# संस्कारक्षम तरुण पिढी घडविण्याचे काम शिक्षकांनी करावे

## मराठवाडा प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सत्कार; नंदकुमार सातुर्डेकर यांचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**देशाची सद्यस्थिती पाहता राजकारण्यांचे तरुणांच्या समस्यांकडे लक्ष नाही. शिक्षण क्षेत्रात अनागोंदी वाढली आहे. प्रवेशाबाबत अडचणी, नीट सारख्या परीक्षांचा घोळ या सर्व अडचणीतून शिक्षण घेऊन पुढे बेकारीचे संकट, बोकाळलेला भ्रष्टाचार यामुळे तरुण वर्ग नैराश्याच्या खाईत लोटला जात आहे हजारो तरुण व्यसनाच्या आहारी जात आहेत. काही आत्महत्या करत आहेत. नैराश्य अवस्थेतून तरुणांना बाहेर काढण्यासाठी संस्कारांची गरज आहे हे काम शिक्षकच करू शकतील असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी येथे केले.**





मराठवाडा प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड या संस्थेच्या देवगिरी इंग्लिश मीडियम स्कूल आणि मातोश्री प्राथमिक विद्यामंदिर ( चिखली) या शाळेतील शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी नगरसेवक कुमार जाधव, उपाध्यक्ष उत्तम दंडीमे, लक्ष्मण लिंबापुरे, संचालिका स्मिता जाधव, प्रीती शिंदे, पूजा जाधव, प्रिन्सिपॉल शहिदा सय्यद आदी उपस्थित होते.


यावेळी सातुर्डेकर म्हणाले की भारतीय संस्कृतीत कृतज्ञता महत्त्वाची आहे. आपल्या संस्कृतीत गुरूला मोठे स्थान आहे मातृदेवो भव,पितृ देवो भव,आचार्य देवो भव, असे म्हटले जाते. जीवनाची परिपक्वता म्हणजे शिक्षण असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले होते. ही परिपक्वता शिष्यामध्ये येण्यासाठी जे कष्ट घेतात ते खऱ्या अर्थाने गुरु होत. आपल्याकडे ऋषीमुनींच्या काळात गुरुकुल पद्धती द्वारा हा प्रयत्न खऱ्या अर्थाने झाला. मात्र कालानुरूप सगळे बदलले आहे . विद्यार्थी संख्या वाढल्याने विद्यार्थ्यांची नावे सुद्धा शिक्षकांना आठवत नाहीत अशी परिस्थिती आहे. बऱ्याच घरात आई-वडील दोघेही नोकरीस असल्याने त्यांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. म्हणूनच शिक्षकांकडे आशेने पाहिले जाते. आजही सर्वात प्रामाणिक घटक म्हणून शिक्षकालाच मान्यता आहे म्हणूनच साक्षरतेचे काम असो कुटुंब नियोजनाचा प्रसार असो की मतदार याद्यांचे काम असो मायबाप सरकारला शिक्षकच आठवतात मात्र शिक्षकेतर कामांचा बोजा शिक्षकांवर लादला जात असल्याने त्यांची कार्यक्षमता कमी होत आहे. असे सातुर्डेकर म्हणाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष कुमार जाधव, उपाध्यक्ष उत्तम दंडीमे, संचालिका प्रीती शिंदे, प्रिन्सिपल शहिदा सय्यद, तसेच कीर्ती दुरुगकर, मालन गाडीलकर, वर्षाली चेंगे, सबीना सय्यद , आरती खोडसुरे या शिक्षिकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# एमबीए म्हणजे उज्वल भविष्य घडविण्याचा राजमार्ग – रवींद्रन गजेंद्रन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**एमबीए म्हणजे उज्वल भविष्य घडविण्याचा राजमार्ग आहे. हे शिक्षण घेत असताना आत्मविश्वासाने नाविन्यपूर्ण संकल्पना विकसित कराव्यात. आजचा विद्यार्थी उद्याच्या मोठ्या आस्थापनांचा व्यवस्थापक आहे. ही जबाबदारी घेताना आत्मविश्वास आवश्यक आहे. तो विकसित करण्याचे काम एसबीपीआयएम इन्स्टिट्यूट करते असे डबलूएनएस ग्लोबल सर्व्हिसेस चे कॉर्पोरेट वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्रन गजेंद्रन यांनी सांगितले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या "आरंभ २०२६ इंडक्शन प्रोग्राम" चे उद्घघाटन रवींद्रन गजेंद्रन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी एमडॉक्स कंपनीचे सॉफ्टवेअर अभियांत्रिकी संचालक रवींदर पाल सिंग, येस बँक समूहचे कार्यकारी उपाध्यक्ष समीर मुळे, एम. वूडपीकर चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक समीर कुलकर्णी, एसबीपीआयएम संचालक डॉ. कीर्ती धारवाडकर, प्रथम वर्ष विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले की, एमबीए हे पुढील जीवनाला योग्य आकार देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांनी माऊथ, माईंड, मूड, मनी, मॅनर्स हा यशाचा मूलमंत्र लक्षात ठेवून आचरण करावे.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आरंभचे आयोजन करण्यात आले होते. रवींदर पाल सिंग यांनी सांगितले की, एआय आज तुमच्या जीवनाचा भाग बनले आहे. तुम्हाला एक चांगला सादरकर्ता बनावे लागेल.

तुमची संशोधन किंवा सर्जनशीलतेची क्षमता गमावू नका नाही तर एआय तुम्हाला गिळून टाकेल. एआय सोबत स्वतःचा विकास करा, मग यश तुमचेच आहे. समीर मुळे यांनी सांगितले की, शैक्षणिक काळात अनुभवातून व्यवस्थापकाला अष्टपैलू बनावे लागते. मोठे ध्येय ठेवा. स्वतःला एका विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित ठेवू नका आणि स्पर्धेत टिकण्यासाठी अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविण्याचा प्रयत्न करा. समीर कुलकर्णी यांनी सांगितले की, स्वतःबद्दल अभिमान बाळगा. तुमचा संपर्क, संवाद कौशल्य आणि शब्दसंग्रह समृद्ध करा आणि निरर्थक गोष्टींवर वेळ वाया घालवू नका.

इनोव्हेंट ड्रम सर्कल या संस्थेने जम्बेग या वादनातून वेगवेगळ्या सुरांवर संगीत तयार करून अनुभव कथन केले. "व्यावसायिक बुद्धिमत्ता आणि आर्थिक निरीक्षण प्रणाली" या विद्यार्थी रिसर्च प्रोजेक्टचे उद्घाटन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

आयोजनात सहयोगी प्रा. ऐश्वर्या गोपालकृष्णन, डॉ. योगेंद्र देवकर, सहयोगी प्रा. डॉ. प्रणिता बुरबुरे, डॉ. विशाल वाघ, सहयोगी प्रा. डॉ. काजल महेश्वरी यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन आणि डॉ. प्रणिता बुरबुरे यांनी केले. आभार डॉ. काजल माहेश्वरी यांनी मानले.

# ‘प्रारंभ’च्या माध्यमातून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

## वास्तुकलेच्या नव्या शैक्षणिक प्रवासाला उत्साहात सुरुवात; विद्यार्थ्यांना मान्यवरांचे मार्गदर्शन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**







**डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानच्या पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, आकुर्डी, पुणे येथे प्रथम वर्ष बी. आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी ‘प्रारंभ’ इंडक्शन डे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वास्तुशास्त्राच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात या कार्यक्रमातून झाली.**

कार्यक्रमास डॉ. राजेंद्र तलवारे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे हे प्रमुख पाहुणे, तर श्री. संदीप महाजन, संचालक व मानव संसाधन विभाग प्रमुख, सार्क विभाग, अस्सा अब्लॉय हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), कॅम्पस संचालक, श्री. बी. एच. शर्मा, मुख्य वित्त अधिकारी, तसेच महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या, डॉ. छाया तिरविर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. प्रमुख पाहुणे आणि सन्माननीय अतिथींनी वास्तुकलेची समाजातील भूमिका व भावी वास्तुविशारदांच्या जबाबदाऱ्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांनी शिस्त व महाविद्यालयीन नियमांचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवास, परीक्षा – संबंधित अनुपालन, महाविद्यालयीन मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली तसेच महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापकांची ओळख करून देण्यात आली.

या कार्यक्रमास मा. सतेज पाटील, अध्यक्ष डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान, आकुर्डी शैक्षणिक संकुल; मा. तेजस पाटील, विश्वस्त; मा. श्रीमती स्नेहा तेजस पाटील, संचालक कार्यप्रणाली; आणि रिअर

ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), कॅम्पस संचालक, डी. वाय. पाटील एज्युकेशनल कॅम्पस यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

आनंदी चेहरे, गोड आठवणी आणि प्राध्यापकांच्या शुभेच्छांसह कार्यक्रमाची सांगता झाली.

# Priyadarshani School Moshi’s student Educational Trip to Bhorgiri Village

**MahaEnews ।**
**PIMPRI-CHINCHWAD**



**Priyadarshani School, Moshi organised an educational trip to Bhorgiri Village for the students of Grades 11 and 12.. The trip was aimed to learn values such as empathy, respect for diversity, social responsibility and environmental awareness.**

The trip aimed to provide students with meaningful exposure to village and tribal life, culture, traditions and livelihoods.

Students had the opportunity to interact with the local people and understand their simple and sustainable way of living.They observed traditional houses, farming practices, local occupations and the close relationship between the community and nature.

The visit helped students appreciate the importance of natural resources and traditional knowledge in rural life. Students also learned about the challenges faced by rural and tribal communities and the importance of education and development.

The interaction with villagers provided valuable insights beyond the classroom and encouraged students to learn through real-life experiences.

The students enthusiastically participated in various activities and documented their observations during the visit.

The Principal and senior teaching staff accompanied the students throughout the educational visit.

Their guidance ensured that the students gained maximum learning from the experience.

The Bhorgiri visit was an enriching and memorable experience that broadened the students’ understanding of rural and tribal India.

The school management appreciated the efforts of the Principal and staff in providing students with such meaningful experiential learning opportunities.